# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : १३
## <u>सभावृत्तांत</u>

दिनांक : १/१/२०१० वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.१/१/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव, मा.कुणचगी - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.जाधव - शिक्षणाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-</u>

विषय क्रमांक :- ८) निराधार महिला व मुलींसाठी वसतिगृह सुरु करणेबाबत..मा.स्मिता गुंजेकर,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ९) पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करणेबाबत..मा.एकनाथ मोटे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १०) प्रभाग क्र.७६ रहाटणी गावठाण येथील पवना नदीकाठी सिमा भिंत बांधणेबाबत..

विषय क्रमांक :- ११) लिपीक पदावर नेमणुक देणेबाबत..मा.एकनाथ मोटे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

ठराव क्रमांक :- २३६ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १/१/२०१० विभाग : स्थापत्य ड मुख्यालय
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/११८९/०९ दि.१४.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

विजयनगर काळेवाडीमध्ये बंद पाईप गटर्स करणे व इंटरलॉकींग पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी र.रु. १९,७९,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३७ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १/१/२०१० विभाग : स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/जा/कावि/२३९७/०९ दि.१६.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भोसरी स.नं.९८/२ गुरुविहार कॉलनीमधील मोकळया जागेभोवती सिमाभिंत, ज्येष्ठ नागरीकांसाठी शेड व धबधबा करणेकामी र.रु.१७,९०,२००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३८ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १/१/२०१० विभाग : नगररचना व विकास
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/५/३०/०९ दि.१९.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ताथवडे या गावाच्या अतिरिक्त क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणेकामी सर्वेक्षणाचे (ELU) कामासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार अंदाजीत र.रु.४३,९४,०००/- खर्च अपेक्षित असल्याने निविदा काढुन सर्वेक्षणाचे कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३९ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १/१/२०१० विभाग : नगररचना व विकास
सुचक :- मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/५/३१/०९ दि.१६.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

म.प्रा.व नि.न.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (ए ए) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१४

वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाच्या प्रस्तावाकामी शासनाने केलेले फेरबदल व मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल याचा तुलनात्मक विचार करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेले फेरबदल अधिक उचित वाटत असल्यामुळे शासनाने केलेल्या फेरबदलाच्या अनुषंगाने फेरबदल न करता मनपाचे समन्वय समितीने सुचविलेल्या फेरबदलचा कलम ३७ च्या ठरावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४० विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १/१/२०१० विभाग : स्थापत्य ड मुख्यालय
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/५३१/०९ दि.१२.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

थेरगाव वॉर्ड क्र.८६ मध्ये ठिकठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु.१२,५५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४१ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १/१/२०१० विभाग : स्थापत्य ड मुख्यालय
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/डमु/५३०/०९ दि.१२.११.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

थेरगाव वॉर्ड क्र.८६ मध्ये डांबरीकरण करणेकामी र.रु.१४,६७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४२ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १/१/२०१० विभाग : माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/१/कावि/८९८/०९ दि.२३.१२.०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निवड यादीतील श्री.मुल्ला अकबर महंमद यांस मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने नेमणुक देणेस तसेच सन २०१० मध्ये मुख्याध्यापक रिक्त होणा-या पदावर प्रतिक्षा यादीतील श्री वारवारे श्रीपती हरी यांस आवश्यकतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक :- २४३ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- १/१/२०१०
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा. स्मिता गुंजेकर,मा.अख्तरहुसेन चौधरी यांचा प्रस्ताव..

समाजातील निराधार, गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय,महाविद्यालयीन व तांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी शक्य त्या सर्व सोयी उपलब्ध करुन देउन त्यांच्यावर चांगले संस्कार करुन त्यांना आदर्श नागरिक बनविणेसाठी पिंपरी चिंचवड शहरातील निराधार महिलांना व मुलींना पिंपरी येथिल स.नं.१२ आरक्षण क्र.१२१ CTS क्र.४६/४९ येथे वसतिगृह बांधणेकामी चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४४ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- १/१/२०१०
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.एकनाथ मोटे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पर्यावरण संवर्धन व प्रदुषण नियंत्रणाकरीता पर्यावरण विभाग कार्यरत आहे. ७४ वी भारताची घटनेची दुरुस्ती नुसार पर्यावरण संरक्षणासाठी सध्या केंद्रशासन व महाराष्ट्रशासनाकडुन विशेष प्राधान्य दिले आहे. त्या आधारे मा.आयुक्त यांच्या आदेश क्र.प्रशा/१/कावि/१३१३/२००९ दि.१६/११/२००९ अन्वये पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष स्थापन झाला आहे. सदर कक्षाचे कामकाज कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता पर्यावरण संवर्धन अधिकारी म्हणुन कामकाजाची जबाबदारी असणा-या सक्षम अधिका-याची नितांत आवश्यकता आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण/१००५/वर्गीकरण/प्रक्र/३७९/०५/नावि२४ मंत्रालय मुंबई दि.०४/०५/२००६ नुसार परिशिष्ट २ मधील अनुक्रमांक २९ अन्वये पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. सदर शासन निर्णयानुसार पुणे व कोल्हापुर महानगरपालिका यांनी पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद निर्माण करुन भरले आहे.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या अभिनामाचे पद निर्माण करावे व त्याची वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता, अनुभव, पात्रता व पद भरावयाची पध्दत सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ठेवावी. सदर पर्यावरण अभियांत्रिकी पद निर्माण करण्यास व भरण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४५ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- १/१/२०१०
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.डप्र/स्था/१/कावि/९३१/०९ दि.३०/१२/०९.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -
प्रभाग क्र.७६ रहाटणी गावठाण येथील पवना नदीकाठी सिमा भिंत बांधणेकामी र.रु.४५,५०,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४६ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- १/१/२०१०
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.एकनाथ मोटे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

पिं.चिं.मनपा शहरामधील कबड्डी खेळासाठी शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार विजेती श्रीमती शितल रत्नाकर मारणे यांना शासनाची पुर्व मान्यता घेवुन महानगरपालिका सेवेत “लिपीक” या पदावर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/ १५ /०९

दिनांक - २/१/२०१० चे लगत सही/-

नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.